पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०३**

**सभावृत्तांत**

दिनांक - **०५/०७/२०१९** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **०५/०७/२०१९** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.अश्विनी भिमा बोबडे - **सभापती**
२. मा.घोलप कमल अनिल
३. मा.पवार मनिषा प्रमोद
४. मा.अनुराधा गणपत गोरखे
५. मा.उषा संजोग वाघेरे(पाटील)
६. मा. काळे उषा दिलीप
७. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.लोणकर – सहा.आयुक्त , मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.मनिषा पवार अनुमोदक – मा.अनुराधा गोरखे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दि.०५/०७/२०१९ ची तहकूब सभा (कार्यपत्रिका क्रमांक - ०२) ही शुक्रवार दिनांक १९/०७/२०१९ रोजी सकाळी ११.१५ वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** शुक्रवार दिनांक **१९/०७/२०१९** रोजी सकाळी **११.१५** वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(अश्विनी भिमा बोबडे)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ०३
सभावृत्तांत
( दिनांक - ०५/०७/२०१९ ची तहकूब सभा )

दिनांक - १९/०७/२०१९ वेळ - सकाळी ११.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ०५/०७/२०१९ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक १९/०७/२०१९ रोजी सकाळी ११.१५ वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.अश्विनी भिमा बोबडे - सभापती**
२. मा.घोलप कमल अनिल
३. मा.पवार मनिषा प्रमोद
४. मा.सुलक्षणा राजू धर
५. मा.प्रमोद कुटे

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आगळे- प्रशासन अधिकारी भ हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०३/०५/२०१९ व २१/०६/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ०४ विषय क्रमांक - ०१
दिनांक - १९/०७/२०१९ विभाग – फ क्षेत्रीय कार्यालय(स्थापत्य)
सुचक : मा.कमल घोलप अनुमोदक : मा.सुलक्षणा धर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.फक्षेका/स्था/३८६/२०१९ दि.२८/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

निग़डी प्रभाग क्र १३ येथे आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करणेसाठी, मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी आदेश दिलेले आहेत. तथापि निगडी प्रभाग क्र १३ येथील मंडप व्यवस्थेचे काम यापुर्वीच अंतिम करून पूर्ण झालेले असल्याने, आता पालखी सोहळ्यासाठी करावयाचे मंडप व्यवस्थेचे काम दुस-या कामातून करणे आवश्यक आहे. तरी सदर निविदा क्र.२८/१२/२०१८-१९, निविदा रक्कम रूपये ११,१७,८९६/- ठेकेदार मे.शालीमार मंडप डेकोरेटर्स यांना कामाचे आदेश दिनांक ३०/१०/२०१८ रोजी देणेत आले असून, कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दिनांक २९/१०/२०१९ अखेरपर्यंत आहे. सदर कामातुन प्रभाग क्र.१३ निगडी येथील आषाढी वारी पालखी सोहळ्य़ासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष करणेकामी मंडप व्यवस्था लागणार आहे. तरी प्रभाग क्र १ चिखलीमध्ये सन २०१८-१९ साठी सांस्कृतीक कार्यक्रमासाठी व मनपा कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करावी या कामातून प्रभाग क्र १३ निगडी येथे आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष करणेसाठी मंडप व्यवस्था करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच निगडी प्रभाग क्र.१३ येथील मंडप व्यवस्थेचे काम यापुर्वीच अंतिम करुन पूर्ण झालेले असल्याने सध्या निगडी प्रभाग क्र.१३ मध्ये मंडप विषयक काम हाती नसल्याने प्रभाग क्र.१ चिखली येथील सन २०१८-१९ साठी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी व मनपा कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे याकामातून प्रभाग क्र.१३ निगडी येथे आषाढी वारी पालखी सोहळयासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष करणेकामी मंडप व्यवस्था पुरविणेचे मंडपाचे कामातून प्रभाग

क्र.१३ निगडी येथील मंडपाची कामे करणे आवश्यक आहे. तरी निविदा क्र.२८/१२/२०१८-१९, निविदा र.रु.११,१७,८९६/- ठेकेदार मे.शालीमार मंडप डेकोरेटर्स यांना कामाचे आदेश दि.३०/१०/२०१८ रोजी देणेत आले असून, कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दि.२९/१०/२०१९ अखेरपर्यंत आहे. तरी प्रभाग क्र.१ चिखलीमध्ये सन २०१८-१९ साठी सांस्कृतिक कार्यक्रमासाठी व मनपा कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे,या कामातून, प्रभाग क्र.१३ निगडी येथे दिनांक – १८ जुलै २०१९ रोजी अण्णा भाऊ साठे पुण्यतिथीचे कार्यक्रमासाठी व दि.१ ऑगस्ट २०१९ पासून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे जयंतीचे औचित्य साधुन प्रबोधन पर्वानिमित्त ५ दिवस मनपामार्फत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन सालाबादप्रमाणे मनपामार्फत करणेत येणार आहे. त्यासाठी कार्यक्रमाच्या ठिकाणी मंडप, ड्रेसींग रुम, स्टेज, खुर्च्या, टेबल,टेबलक्लॉथ, झालर, रोस्ट्रम ,समईद्व स्वागत कमान तसेच अधिकारी, पत्रकार, नगरसदस्य, मान्यवर यांची बैठक व्यवस्था इत्यादि कामकाज करणेकामी मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.१३ निगडी गावठाणमधील महाराणा प्रताप पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणे, सिमाभिंतीची उंची वाढविणे व अनुषंगीक कामे करणे. याकामाची निविदा क्र.२८/१५-२०१८-१९ ठेकेदार मे.पी.एन नागणे निविदा र.रु.२९,९९,३८६/- हे काम जागेवर रु.९,००,०००/- इतक्या रकमेचे झालेले आहे. सदर ठिकाणी रजपूत समाज संघटनेची मागणी व स्थानिक नगरसदस्य यांनी सुचविलेनुसार इतर सुशोभिकरणाची कामे सदर प्रभागातील स्थापत्य विषयक कामे करणे या कामातून पूर्ण करुन घेणेत आलेली आहेत. त्यामुळे या निविदेचे काम करणेसाठी जागा उपलब्ध नाही. या निविदेतील शिल्लक रकमेची कामे दुस-या ठिकाणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे या कामातून प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण मधील मुस्लीम दफनभुमीच्या सिमाभिंतीची उंची वाढविणे त्यास मिहराब व मिनार बांधणे हे काम मुळ निविदेमध्ये पूर्ण होत नसलेने त्याची उर्वरीत प्लास्टर व पेंटींग व इतर स्थापत्य विषयक कामे करणे आवश्यक आहे. सदर मिहराब मिनारची अर्धवट कामे वरील शिल्लक कामातून करणेबाबत स्थानिक नगरसदस्य यांनी मागणी केलेली आहे. तरी सदर मिहराब व मिनारची उर्वरीत प्लास्टर, पेंटींग व स्थापत्य विषयक कामे प्रभाग क्र.१३ निगडी गावठाणमधील महाराणा प्रताप पुतळा परिसराचे सुशोभिकरण करणे सिमाभिंतीची उंची वाढविणे व अनुषंगीक इ. काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(अश्विनी भिमा बोबडे)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/३/कावि/२४०/२०१९
दिनांक : १९/०७/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.